म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र.

# त्र-पराग



REFBK-0014800
REFBK-0014800

लेखक : विनायक गोविंद साठये

अनन्याश्चिन्तयन्तो माम् ये जनाः पर्युपासते
तेषाम् नित्यभियुक्तानाम् योगक्षेमम् वहाम्यहम्

श्रीभगवान् कृष्ण

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४००५८ दि: ३१०२१
१६८८ नों दि: २८।१२

# सूत्र-पराग

## संस्कृत नारदीय भक्तिसूत्रांचा मराठी आशय

लेखक : विनायक गोविंद साठये

वीररसायन, वीरश्रीशृंगार, नूपुर, संजीवनीहरण, सत्यनारायण, आसेतुहिमाचल, वेणीरामायण, कोंड्याचा मांडा इत्यादींचे कर्ते, कवि व कथालेखक

REFBK-0014800
REFBK-0014800
१४८००

अध्यात्म परिषद् सांगली पुरस्कृत प्रकाशन १६ वें

मूल्य : सव्वा रुपया

## मागणें

उपनिषदें जें गाति । योगिये हृदयीं रिगोनि पाहती ।
जयातें सनकादिक आहाति । पोटाळूनिया ॥ १ ॥
ऐसें अगाध जें तुझें । विश्वरूप कानीं ऐकिजे ।
तें देखावया चित्त माझें । उतावीळ देवा ॥ २ ॥
तुझें विश्वरूप आघवें । माझिये दिठीसी गोचर होआवें ।
ऐसी थोर आस जीवें । बांधोनि आहें ॥ ३ ॥

ज्ञानेश्वरी, अध्याय ११

सर्व हक्क लेखकाधीन

प्रथमावृत्ति : जुलै १९६५
प्रति : १०००

प्रकाशक : पुंडलीकजी कातगडे, प्रमुख, "स्नेहसंवर्धक संघ, मिरज"
मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी मुंबई नं. ४

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण :
(१) विनायक गोविंद साठये राधागोविंदधाम, ब्राह्मणपुरी, मिरज.
(२) पुंडलीकजी कातगडे रामदेवगल्ली, बेळगांव.

## अभिप्राय

### १

"सूत्र पराग" वाचून आनंद झाला. श्री. साठये हे कसलेले लेखक आहेत. "परागा"च्या श्लोकांची भाषाही प्रगल्भ तरी सोपी व ओघवती आहे. प्रासादिक आहेच. सामान्य वाचकांला "नारदभक्तिसूत्रें" यांची तोंडओळख करून देण्यास या पुस्तिकेचा चांगला उपयोग होईल. भक्तिदर्शन हा विषय विशाल, खोल आहे. नारद भक्तिसूत्रें चांगलीं समजण्यास त्यांवरील मोठ्या भाष्यांचा अभ्यास करणें अवश्य आहे. सूत्रें नेहमींच अत्यंत थोड्या शब्दांत फार मोठ्या अर्थांचा अंतर्भाव करण्याच्या हेतूनें योजलेलीं असतात. भाष्यावांचून त्यांचा खोल व पूर्ण अर्थ कळणें शक्य नाहीं. सूत्रांचें स्थूलमानानें ज्ञान व्हावें एवढाच त्यांचा हेतु आहे व तो सफल झाला आहे.

सूत्रांवरील भाष्यांचा अभ्यास करून श्री. साठये यांनीं नारदभक्तिसूत्रांवर एक विवेचनात्मक काव्यग्रंथ लिहिला तर तो फार उपयुक्त होईल. असा प्रयत्न त्यांनीं अवश्य करावा. त्यांत उच्च स्वार्थ व परार्थ दोन्ही साधतील.

अध्यात्मविद्यामंदिर<br>सांगली, दि. २५-१०-६५

(सही) **ग. वि. तुळपुळे**, एम्. ए.<br>सेवानिवृत्त डे. पी. एम्. जी., मुंबई

### २

श्री. विनायकराव साठये हे नुसतेच कवि नव्हेत ते भक्तही आहेत. म्हणूनच आपल्या कवित्वशक्तीला भक्तिसूत्राकडे वळविण्याची त्यांना स्फूर्ति झाली. भक्तिरहस्य थोडक्यांत समजून घेण्यास नारदभक्तिसूत्रें फारच उपयुक्त आहेत. पण तीं अल्पाक्षर असल्यानें व संस्कृतमध्यें असल्यानें सर्वसामान्य लोकांचा मार्गदर्शक होऊं शकत नाहींत. मराठीमध्यें त्यांचें श्लोकबद्ध पण सुगम

असें विशदीकरण करून श्री. विनायकरावजी यांनीं मराठी भक्तजनांची एक नवीन सोय करून दिली आहे.

देवर्षि नारदांचें हृद्गत उकलून दाखविण्याचा प्रयत्न प्रशंनीय आहे. त्यानिमित्तानें आधुनिकांचें लक्ष इकडे वेधले यांत शंका नाहीं. कवि स्वतः भक्तिरसाचा आस्वाद घेत आहे हें पाहून भक्तजनांच्या तोंडास पाणी सुटेल व "भक्ति" हा रस आपणही चाखून बघावा असें त्यांना वाटेल.

पानांत वाढलेल्या पक्वान्नांतील खोडच काढावयाची तर एक मुद्दा मात्र व्हावा तितका स्पष्ट झाला नाहीं. "येन केन प्रकारेण मनः कृष्णे निवेशयेत्" अंतःकरणांतील सर्व वृत्ति भगवंताकडे लावाव्यात. "सर्वभावे भजन" तें हेंच होय. गोपिकांस कामें, कंसा भयसंभ्रमें, शिशुपालादिका द्वेषें आणि नारदा, ध्रुवा, अक्रूरा, शुका आणि सनत्कुमारा भक्तिभावें श्रीहरि सर्वांना सारखाच प्राप्य आहे. भाव बुरे असतील तर त्यांचें Sublimation उदात्तीकरण भगवान् स्वतः करितो. हाच भक्तीचा सोपेपणा—एकादश भावामध्यें कान्तासक्ति अंतर्भूत आहे आणि म्हणूनच "यथा व्रजगोपिकानाम्" हें सूत्र आलें आहे व त्यांत "माहात्म्यज्ञानविस्मृति" नसल्यामुळें अपवादाला (निंदेला) जागा नाहीं. माहात्म्यज्ञानविस्मृति असेल तर तें जारप्रेम होईल. एरवीं नाहीं. असा देवर्षींचा आशय आहे तो स्पष्ट झाला नाहीं. भाषा सोपी करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. पण त्यांच्या भाषाशैलीचा पिंडच संस्कृत-प्रचुर असल्यानें कदाचित् हीं सूत्रें सर्वांना सुगम वाटणारही नाहींत. परंतु भक्तिसूत्रांकडे आधुनिकांचें लक्ष मात्र वेधलें जाईल यांत शंका नाहीं.

किल्ला मिरज
दि. ११-१०-६४

**हरेराम बालकृष्ण बोडस,** एम्. ए. बी. टी.
झाला वेदान्त प्राईजमन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४००५७ वि: का०४
क्रमांक ९६८६ नों: दि: २८।१।५५

# चमत्कार

६–३–६४ दिनांकीं श्री हरिद्वारच्या बाजारांतील एका पुस्तकविक्रेत्याच्या दुकानीं पडलेली पारमार्थिक पुस्तकांची रास मी चाळींत होतों तों मला यात्रिकाला व्हावें तें देवदर्शन कुठलें एका पुस्तकानें अवचित प्रेमदर्शनच घडवलें! लेखक पहावे तो "कल्याण" कर्ते प्रसिद्ध हनुमानप्रसादजी पोद्दार! मी चकित झालों कीं केवळ पारमार्थिक लिखाणालाच वाहिलेला म्हणून विख्यात असलेला हा लेखणीबहाद्दर देवर्षि नारदांच्याही समक्ष असा कसा प्रेमपंकांत फसला? मला तो एक मोठाच चमत्कार जाणवला. आठ आणे तत्काल त्या विक्रेत्याहातीं देऊन मीं तें पुस्तक हस्तगत केलें व धर्मशाळेची वाट धरली. स्थिरासनीं बसून मी वाचूं लागलों तों तों पानामागें पानें मला इतकीं रुचकर लागत चाललीं कीं त्यांना चटावून गेलों. आरंभीं मला वाटलें होतें कीं ज्याला दर्शनमात्रेंही मी विटेन तेंच नेहमींचें ऐहिक पानचट प्रेम तीं पानें माझ्यापुढें वाढतील. पण घडलें तें अगदींच वेगळें घडलें. मला भाविकाला त्या सूत्रासूत्रांतून श्री नारदांनीं आपली अखंड भक्तिधारा पोटभर वाढली. लागलींच भरल्या पोटीं प्रेरणा बळावली कीं संस्कृतांतील या भक्ति-सूत्रांचें मराठीकरण प्रयत्नपूर्वक आपण अवश्य करावेंच.

समर्थांच्या मनोबोधाचें प्रसिद्ध वृत्त भुजंगप्रयात. त्याची ठीक सोबत लाभून हीं सूत्रामागें सूत्रें माझ्या हातीं मराठींत झपाझप उतरत गेलीं. दिनांक १९–८–६४ च्या पहाटें भगवान् नारदांच्या भक्तिकल्पलतेच्या संस्कृत पुष्पांचा हा "सूत्रपराग" जनताजनार्दनापदीं मला मराठींत सिद्धपणें वाहतां आला हीच देवर्षींची कृपा व माझें सौभाग्य.

या सूत्रपरागाच्या प्रसारार्थ मला कधीं अनेक सूत्रें एकत्र घेऊन एकाच श्लोकद्वारां विवरतां आलीं आहेत तर कधीं एकाच सूत्राचा आशय अनेक श्लोकांनीं विवरावा लागला आहे. यामुळें मूलभूत ८४ सूत्रांना मराठी रूप देतांना १०३ श्लोक निर्माण झाले आहेत.

हें पुस्तक जात्याच छोटें आहे. पण भाविक वाचकांनीं त्याला लुब्ध व्हावें, हातीं घ्यावें अशी त्या ठायीं सांगता ज्यांच्या ज्यांच्या प्रेमळ आणि परोपरीच्या हातभारामुळें येऊं शकली त्या सर्व उपकर्त्यांचा मी अत्यंत आभारी आहें— त्यांची नामावली द्यावी म्हटलें तरी कुठवर द्यावी? जनताजनार्दनापायीं नम्र झाल्यावर माझें वंदन त्या सर्वांना आयतें पोचणारच. या सूत्रपरागानें हें पटविलें म्हणजे पुरे.

दि. १९-८-६४<br>राधागोविंदधाम

सर्वांचा ऋणी,<br>**विनायक गोविंद साठ्ये**, मिरज

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ६००५८ दिः ०१।०५
क्रमांक १९८६ नों दिः २८।।५

# अनुक्रम


| अनुक्रम | प्रकरण | सूत्रें | श्लोक |
|---|---|---|---|
| १. | नमन | — | — १ |
| २. | प्रेमरूपा भक्तीचें स्वरूप | १– ६ | २– ६ |
| ३. | प्रेमांतील अनन्यता | ७–१४ | ७– १२ |
| ४. | प्रेमरूपा भक्तीचीं लक्षणें व उदाहरणें | १५–२४ | १३– २१ |
| ५. | प्रेमरूपा भक्ति म्हणजे फलरूपा भक्तिच | २५–३३ | २२– २८ |
| ६. | प्रेमरूपा भक्तीचें साधन आणि सत्संग महिमा | ३४–४२ | २९– ३४ |
| ७. | प्रेमरूपा भक्तीमध्यें मुख्य विघ्न कुसंगति | ४३–४५ | ३५– ३६ |
| ८. | मायेपार कोण पोहोचूं शकतो ? | ४६–५० | ३७– ४० |
| ९. | प्रेमरूपा भक्ति व गौणी भक्ति | ५१–५५ | ४१– ४३ |
| १०. | गौणी भक्तीचे गुणभेदानुसार वा आर्तादि भक्तभेदानुसार तीन प्रकार | ५६–५७ | ४४– ४८ |
| ११. | भक्तिची सुलभता आणि महत्ता | ५८–६० | ४९– ५० |
| १२. | भक्तिचीं साधनें व विघ्नें | ६१–६५ | ५१– ५८ |
| १३. | प्रेमी भक्तांचा महिमा | ६६–७२ | ५९– ७१ |
| १४. | वादविवादरूपी विघ्नें | ७३–७५ | ७२– ७४ |
| १५. | भक्तीचे प्रमुख पुरस्कर्ते | ७६–७९ | ७५– ९० |
| १६. | प्रेमा भक्तीचें फल आणि तिची सर्वश्रेष्ठता | ८०–८४ | ९०–१०२ |
| १७. | उपसंहार | — | –१०३ |

# सूत्र-पराग

## संस्कृत नारदीय भक्तिसूत्रांचा मराठी आशय

१. **नमन** :—हे मंगलमय परमेश्वरा, तुला भक्तिपुरःसर प्रणाम. तुझी भक्ति कशी करावी ते भगवान् देवर्षि नारदांनीं आपल्या "भक्तिसूत्र" द्वारा विशद केलें आहे. पण तीं सूत्रें संस्कृत भाषेंत रचलेलीं. प्राकृत मराठी बोलणाऱ्यांना त्यांचा अर्थबोध थोडा तरी व्हावा म्हणून केलेला हा नम्र प्रयत्न सुफल होवो एवढेंच तुझ्या चरणीं मागणें.

वृत्तः भुजंग प्रयात :

**तुझ्या भक्तिच्या खूणगांठी कथाया**<br>**उभ्या नारदांच्या नमस्कार पाया**<br>**जना प्राकृता देववाणी कळावी**<br>**प्रभो, साधकांची पुरी हांव व्हावी ॥ १ ॥**

२. प्रेमरूपा भक्तीचें स्वरूप. सूत्रें १–६ श्लोक १–६

**अथाऽतो भक्तिम् व्याख्यास्यामः ॥ १ ॥**<br>**सा तु अस्मिन् परम प्रेमरूपा ॥ २ ॥**<br>**अमृतस्वरूपा च ॥ ३ ॥**

आतां आपण भगवद्भक्तीची व्याख्या करूंया. परमेश्वराविषयीं भक्ताला वाटणारें अत्यंत गाढ प्रेम म्हणजेच भक्ति. त्या भक्तीचें स्वरूप तेंच अमृत होय.

सखा देव माझा सखा मीहि त्याचा
असा भक्तचित्तामधें भावनेचा
स्फुरे स्वैर जो सत्वसंपन्न ओघ
मिळे भक्ति हें नांव त्याला अमोघ ॥ २ ॥
नसे देखली चाखली मानवानें
सुधा कल्पनागम्य ती ज्या सदन्नें
सुरा स्वर्गता पोष संतोष होई
तशी भूगता भक्ति भक्ता रसोई ॥ ३ ॥

**यल्लब्ध्वा पुमान् सिद्धो भवति, अमृतो भवति तृप्तो भवति ॥ ४ ॥**

परमेश्वराविषयीं गाढ प्रेम प्राप्त झालेला भक्त सिद्धावस्थेला पोचतो. त्याचें मर्त्यपण संपतें. त्याला अखंडित समाधान लाभतें.

सुखस्पर्श ज्या भक्तिचा ठीक झाला
विनायास बाणेचि सिद्धत्व त्याला
अमर्त्यत्व मर्त्यांहि भक्तासि येतें
नसे खंड त्याच्या मनीं तृप्ततेतें ॥ ४ ॥

**यत् प्राप्य न किंचित् वांच्छति न शोचति न द्वेष्टि न रमते नोत्साही भवति ॥ ५ ॥**

साधकाला देवाविषयीं गाढ प्रेम लाभलें कीं तो कशाचीच वांच्छा करीत नाहीं, कोणत्याच उणीवेचा त्याला शोक होत नाहीं. तो कोणाचाही द्वेष करीत नाहीं, कोणाशींच रममाण होत नाहीं, कशाच्याही हव्यासानें तो भारला जात नाहीं.

सखी लाभतां भक्ति ना भक्त वांच्छी
दुजें कांहीं त्या वाण ना जाणवेचि
कुणाचा शिवे द्वेष ना लाभ त्यास
न हव्यास वा सोस पोचे उतास ॥ ५ ॥

**यत् ज्ञात्वा मत्तो भवति स्तब्धो भवति आत्मारामो भवति—॥ ६ ॥**

गाढ प्रेमाची चव एकदां चाखल्यावर साधकाचें भान हरपतें, तो बातचीत करीत नाही, आपल्या आत्म्याच्या मात्र नादांतच गुंगतो. स्वतांच राम आहों असें त्याला ठसतें.

घडे ओळखीची पुरी भक्ति ज्याला
तिचा एकला ध्यास लागेचि त्याला
बने मत्त मौनी रमे आत्मरामीं
निजस्वासि त्या एकल्या लावि कामीं ॥ ६ ॥

३. प्रेमांतील अनन्यता सूत्रें ७–१४ श्लोक ७–१२

**सा न कामयमाना निरोधरूपत्वात् ॥ ७ ॥**
**निरोधस्तु लोकवेद व्यापार न्यासः ॥ ८ ॥**

निरोधरूपी भक्ति म्हणजे कामविर्वजित, निष्कामभक्ति. लोकांनीं तशींच वेदांनीं सांगितलेलीं कर्मेंदेखील टाकून मोकळें होणें म्हणजेच निरोध होय—

निरोधाश्रिता भक्ति निष्काम राही
पुसे लौकिका ती न वेदाहि कांहीं
तिला काम्य कर्मादिचा हो न सोस
पडे वासनेचा मुळीं गांव ओस ॥ ७ ॥

**तस्मिन्नन्यता तद्विरोधिषूऽदासीनता च ॥ ९ ॥**
**अन्याश्रयाणाम् त्यागोऽनन्यता ॥ १० ॥**

स्वदैवताशीं कायावाचामनानें एकजीव होऊन जाणें व त्याविरुद्ध जें जें कांहीं असेल तिकडे लक्ष मुळींच न देणें, दुसऱ्या कोणालाही शरण न जाणें अशा भक्तिभावनेलाच अनन्य भक्ति म्हणतात.

जगन्नायका एकल्या सर्व भावें
भजावें; विरुद्धा न भक्तें पुसावें
त्यजावेंचि, तद्भक्ति ती हो अनन्य
न जी ठाव मागे प्रभूहून अन्य ॥ ८ ॥

**लोके वेदेषु तदनुकूलाऽचरणम् तद्विरोधिषूऽदासीनता ॥ ११ ॥**

परमेश्वर प्रसन्न व्हावा म्हणून भक्तांनीं जीं कांहीं वेदोक्त कर्तव्यकर्मे आहेत तीं करणें व देवाशीं वैर धरून वागणाऱ्याविषयीं उदासीन असणें हीं दोन्ही अनन्यभक्तीचींच लक्षणें आहेत.

प्रभु-प्राप्ति व्हावीच या प्रेरणेनें
करो भक्त वेदोक्त कर्में प्रयत्नें
जपो लोकरीति प्रभुद्रोहकांची
उपेक्षा करो ही स्थिरा भक्ति साची ॥ ९ ॥

## भवतु निश्चय दार्ढ्यादूर्ध्वं शास्त्ररक्षणम् ॥ १२ ॥

साधकानें अनन्य भक्तच व्हावें असा पक्का निश्चय मनाशीं केल्यावरच त्यानें शास्त्रोक्त कर्मांकडे वळावें.

अशा निश्चयें बांधला श्लाघ्य भक्त
न हो शास्त्र सोडूनि वागूं प्रवृत्त
करूं कीं करूं कर्म ना ? हा विवेक
न घेतां धजे निंदती त्यासि लोक ॥ १० ॥

## अन्यथा पातित्यशंकया ॥ १३ ॥

साधकानें शास्त्राला न पुसतां दडपून हवें तसें वागण्यास सवड घेतली तर आपसुखेंच तो अधःपतित होईल. प्रभुप्राप्ति मग कुठली ?

अशास्त्रीयही ये मना तेंच केलें
अधःपात धृष्टा घडे त्याच वेळे
सुखा ऐहिका तो मुके; केविं सिद्ध
—दशे तो शिवे ? मुक्त ना होय बद्ध ! ॥ ११ ॥

## लोकोऽपि तावदेव किन्तु भोजनादि व्यापारस्त्वाऽशरीर-धारणावधि ॥ १४ ॥

साधकानें ऐहिक लौकिकासोबतच अन्नापानादिक चालतें ठेवून आपल्या शरीरालाही जपलें पाहिजे.

सदा अच्युतीं गुंतलें जों स्वचित्त
हवा पोसण्या देह राहूं जिवंत
नये वर्जितां अन्नपानादि भक्ता
प्रसाद प्रभूचा जसा प्राप्त होतां ॥ १२ ॥

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ४००५७ वि: का०५



**तल्लक्षणानि वाच्यन्ते नानामतभेदात् ॥ १५ ॥**
**पूजादिष्वनुराग इति पाराशर्यः ॥ १६ ॥**

प्रेमरूपा भक्तीचीं विविध मतभेदानुसार लक्षणें आतां सांगूं या. वेदव्यासांच्या मतें देवपूजेला अहोरात्र साधकानें वाहून घ्यावें.

कशी भक्ति कीजे मतें, रीति भिन्न
भले बोलले भक्तिवेत्ते धुरीण
वदे व्यास "सर्वस्व भक्तें वहावें
प्रभूला सदा ध्यात गावें भजावें" ॥ १३ ॥

**कथादिष्विति गर्गः ॥ १७ ॥**

गर्ग महामुनींच्या मतें भगत्कथादिकांत रमावें—

जगन्नाथ—लीला—कथा आयकाव्या
कथाव्या अहोरात्र रंगूनि गाव्या
रुचे हेंच आचार्य—गर्गा सुकर्म
मिळे कीर्तनीं तें न अन्यत्र शर्म ॥ १४ ॥

**आत्मरत्यविरोधेनेति शांडिल्यः ॥ १८ ॥**

शांडिल्यांच्या मतें, भक्तानें त्याच्या भक्तिमार्गांतलीं विघ्नें निवारून आत्मरत व्हावें. स्वतःच ब्रह्म म्हणून ओळखून चिरंतन सुख भोगावें.

सुख प्राप्त वा दुःख देहासि होतें
मुळीं अंतरात्म्यासि बाधूं नये तें
अशी शक्ति ये भक्ति—लीनासि मात्र
वदे निश्चियें तत्त्व शांडिल्य—सूत्र ! ॥ १५ ॥

**नारदस्तु तदर्पिताऽखिलाऽचारता तद्विस्मरणे परम व्याकुलता इति ॥ १९ ॥**

नारदांच्या मतें, भक्तानें आपण जें जें कांहीं करूं तें तें सर्वथा परमेश्वरार्पण करावें. देवाचें विस्मरण क्षणभरदेखील होण्यापेक्षां भक्ताला मरण आलेलेंच बरें वाटावें.

घडे कर्म तें तें अनंता वहावें
चुकावें न भक्तें व्रता आचरावें
बरा विस्मृतीहूनि देहान्त झाला
रुचे नारदा हेंचि भक्त्याश्रिताला ॥ १६ ॥

**अस्त्येवमेवम् ॥ २० ॥**
**यथा व्रजगोपिकानाम् ॥ २१ ॥**

परमेश्वरभक्तीचें एकदां का व्रत घेतलें कीं सर्वपरीनें आणि सदासर्वदा भक्ति एके भक्तीच कर्तव्य होतें. तिला एवढासाही खंड पडूं देणें बनतच नाहीं. याला उदाहरणच द्यायचें झालें तर गोकुळांतील गवळणींचेंच देतां येणारें आहे.

खऱ्या गोकुळांतील गोपीच धन्य
अहोरात्र कृष्णापदीं ज्या अनन्य
मनें तेविं देहें धनें लीन होती
शिको विश्व ज्यांच्याकडे कृष्णभक्ति ॥ १७ ॥
कडे बाल-कृष्णासि त्या गोपिकांनीं
वहावें फिरावें हवें त्या ठिकाणीं
नदीकांठ हो गेह वा गायरान
पडो केवढी चाल त्या भागल्या न ॥ १८ ॥
यशोदांक टाकी करी पाठलाग
जिचा कृष्ण ती गोपिका दे निजांग
पिऊं, त्या पुसे "सावळ्या, वेड लागे
तुला कीं मला ?" हें दुजा कोण सांगे ! ॥ १९ ॥

**तत्रापि न माहात्म्यज्ञान विस्मृत्यपवादः ॥ २२ ॥**

त्या बाळकृष्णानें आणि त्या गोपींनीं एकमेकांच्या हव्या त्या आणि हव्या तितक्या खोड्या केल्या तरी त्यांत कटुता लेशमात्रही निर्माण कधींच झाली नाहीं. गोडी कमी न होतां सदैव वाढलीच. श्रीकृष्णावर त्यांचें आणि त्यांच्यावर कृष्णाचें होतें तें आईचें आपल्या अपत्यांवर असतें तेंच निष्पाप, निर्मल, अलोट प्रेम नांदलें. इतकी पराकोटीची सलगी ठेवून देखील

श्रीकृष्णाच्या देवत्वाची, त्याच्या उच्च पदवीची त्या गोपिकांना कधींच विस्मृति झाली नाहीं.

अपत्त्यासवें प्रेमला माय बोले
तशी निर्मला कृष्ण गोपींत चाले
सदा प्रेमवार्ता तरी भक्त देव
टिके सिद्ध दोघांत नातें सदैव ! ॥ २० ॥

**तद् विहीनम् जाराणाम् इव ॥ २३ ॥**
**नास्त्येव तस्मिंस्तत् सुखसुखित्वम् ॥ २४ ॥**

श्रीकृष्ण हें आपलें आराध्य दैवत आहे आणि आपण त्याच्या पायाच्या सेविका सदाच्याच आहों ही त्यांच्या अंतर्यामीं पुरेशी खोल जाणीव असल्या-मुळेंच त्यांच्या त्या सलगीला जारकर्मासारखीं नांवें ठेवितां येणार नाहींत. त्या कृष्णानें आणि गोपींनीं जी एकमेकांत सुखाची देवाणघेवाण केली ती देव आणि भक्त यांनाच साधण्याशोभण्याजोगी एकजीवपणाची होती. इंद्रियनिष्ठांना दिव्य सुखाची, भक्तीची लज्जत कोठली यावी ?

शुचि स्नेह नारीनरीं पोसला न
ठरे निंद्य तो जारकर्मासमान
सुखें नश्वरें इंद्रियाधीन त्यांत
खरीं शाश्वतें देवभक्तानुभूत ॥ २१ ॥

५. प्रेमरूपा भक्ति म्हणजे फलरूपा भक्तिच. सूत्रें २५–३३ श्लोक २२–२८

**सा तु कर्मज्ञानयोगेभ्योऽत्यधिकतरा ॥ २५ ॥**

शाश्वत सुखाचा अनुभव जिच्यामुळें गोपीजनासारख्या एकनिष्ठ भक्तांना प्राप्त होतो ती प्रेमरूपा भक्ति कर्म, ज्ञान आणि योग या तीनही देवभेटीच्या हमखास साधनांहून अधिक योग्यतेची आहे.

प्रभुप्राप्ति सत्कर्मयोगाऽश्रयानें
तशी ज्ञान तन्निष्ठ हो जोडल्यानें
समाधिस्थ योग्याहि भेटेच देव
त्रिधा मार्ग हे भक्तिशीं तुल्य नैव ॥ २२ ॥

फलरूपत्वात् ॥ २६ ॥

परमेश्वराविषयीं भक्ताला अनन्य प्रेम वाटणें यांतच तिची सफलता आहे. कर्मज्ञानयोगमार्गाश्रयानें हस्तगत होणारी भक्ति केवळ प्रेमरूपच असते.

जिला प्रेमरूपा असे लेखली ती
स्वयें न प्रभुप्राप्तिचा मार्ग भक्ति
फलप्राय ती कर्मठा ज्ञानि–योगि—
—जना देव दे तुष्ट जो स्वांतरंगीं ॥ २३ ॥

ईश्वरस्याप्यभिमान द्वेषित्वाद् दैन्यप्रियात्वाच्च ॥ २७ ॥

देवाला स्वभावतःच अभिमानाचें वांवडें वाटतें. तो कुणाचाच पक्षपाती नाहीं तसाच द्वेष्टाही नाहीं. मात्र हीनादीनाविषयीं त्याला कळवळा वाटतो आणि म्हणूनच गर्विष्ठांना दुर्बलपीडकांना तो पेचांत धरून शिक्षा करतो.

कुणाचा न कैवार घेणें स्वभावें
तसा मांडणें द्वेष देवासि ठावें
तरी दीनबंधुत्व त्या आवडेच
बळे दंडि गर्वोद्धता घालि पेच ॥ २४ ॥

तस्याःज्ञानमेव साधनमित्येके ॥ २८ ॥
अन्योन्याश्रयत्वमित्यन्ये ॥ २९ ॥

ज्ञानलाभ हेंच कांहींच्या मतें भक्तीचें साधन आहे तर कांहीं इतरांच्या मतें ज्ञान आणि भक्ति हींच एकमेकांचीं उदयस्थानें आहेत.

फुटे पालवी ज्ञानवृक्षासि भक्ति
असा कांहिं वेत्ते अभिप्राय देती
दुजे "भक्तिला ज्ञान जें जन्म देतें
म्हणे "भक्तिपोटींच आश्चर्य ये तें ! ॥ २५ ॥

स्वयं फलरूपेति ब्रह्मकुमाराः ॥ ३० ॥

प्रेमरूपा भक्ति ही स्वभावतः सुफळ आहेच असा निवाडा स्वतः सनत्कुमार आणि देवर्षि नारद दोघेही देतात.

कुमारा सनत्पूर्वका भक्तिवेत्त्या
पुसा नारदा तेविं, हो, प्राप्ति भक्त्या
कशाची घडे ? "भक्ति ये भक्तिपोटीं
निवाडा असा ठाम दोघेही देती ॥ २६ ॥

**राजगृहभोजनादिषु तथैव दृष्टत्वात् ॥ ३१ ॥**
**न तेन राजपरितोषः क्षुधाशान्तिर्वा ॥ ३२ ॥**

नुसता राजवाडा दुरून पाहतां आला आणि हवें असलेलें राजाचें दर्शन मात्र घडलेंच नाहीं. पक्वान्नांच्या राशींच्या राशी पुढ्यांत दिसल्या पण त्यांतला कणदेखील भुकेजलेल्या पोटीं जाऊं शकलाच नाहीं. हीं दोन्ही दृश्यें दिसून देखील निष्फळ होत. तसेंच भक्तीच्या पोटीं निपजावी ती भक्ति निपजली पण टिकलीच नाहीं तर तिचा तो देखावा वायांच ठरतो. भक्तिमधून भक्ति उत्पन्न होणेंच इष्ट !

नृपा वांच्छि भेटूं नृपावास त्यास
दिसो वा भुकेल्यासि पक्वान्नरास
वृथा; जों नृपाची कृपा हो न, अन्न
मुखीं ना निघे भक्ति जो भक्तितून ॥ २७ ॥

**तस्मात्सैव ग्राह्या मुमुक्षिभिः ॥ ३३ ॥**

आपल्याला मुक्ति लाभावी असें म्हणणाऱ्यांनीं या भक्तीचाच आश्रय घ्यावा.

नृपाची कृपा प्राप्त हो भेटल्याला
समाधान होतें स्वयें जेवल्याला
तशी स्वाश्रिता भक्ति देतेचि मुक्ति
हवी मुक्ति ज्या तो धरो गाढ भक्ति ॥ २८ ॥

६. प्रेमरूपा भक्तीचें साधन आणि सत्संग महिमा सूत्रें ३४–४२ श्लोक २९-३४

**तस्याः साधनानि गायन्त्याचार्याः ॥ ३४ ॥**
**तत्तु विषयत्यागात् संगत्यागाच्च ॥ ३५ ॥**

प्रेमरूपा भक्तीचीं साधनें भक्तिशास्त्रांतील आचार्यांनीं गाऊन ठेवलीं आहेत. तीं साधनें म्हणजे विषयोपभोगांचा त्याचप्रमाणें आपल्या सत्कर्मांच्या फलांची आशा टाकणें.

कशी प्रेमरूपा करूं भक्ति ये तें
निके पाठ साधूक्त ध्यावेत भक्तें
सुखें इंद्रियप्राप्य तैशी स्वकर्म—
फलासक्ति टाकोचि जो भक्तिकाम ॥ २९ ॥

**अव्यावृतभजनात् ॥ ३६ ॥**

खंड पडूं न देतां रात्रंदिवस भजन चालू ठेवण्यानेंच प्रेमरूपा भक्ति प्राप्त होते.

मुखांतूनि वाहो सदा रामनाम
दिसो दृष्टि पोचे तिथें एक राम
करीं त्याच पूजूनि पाया चुरावे
अखंडाश्रयें साधकें भक्त व्हावें ॥ ३४ ॥

**लोकेऽपि भगवद्गुणश्रवणकीर्तनात् ॥ ३७ ॥**

लौकिक व्यवहार करीत असतांनाही भगवंताचे गुण गावेत व ऐकावेत ही.

जगाच्या रहाटीसवें कामधाम
करो खेळवो सारखें रामनाम
स्वतःच्या परांच्याहि कर्णांमुखांत
असा पोहतो भक्तिसिंधूंत भक्त ॥ ३१ ॥

**मुख्यतस्तु महत्कृपया एव भगवत्कृपालेशाद्वा ॥ ३१ ॥**

मुख्यत्वें करून थोरामोठ्या संतांच्या कृपेनेंच आणि भगवंताच्या थोड्याशाही कृपेचा लाभ झाल्यानेंच प्रेमरूप भक्ति साध्य होते.

प्रभूशीं हवें गाढ ज्या सख्य भक्ता
करो पूर्ण संतुष्ट तो साधुसंतां
घडे सत्कृपेनेंच वा विश्वनाथ—
—कृपांशेंहि लोकीं स्वभक्त्या कृतार्थ ॥ ३२ ॥

**महत्संगस्तु दुर्लभोऽगम्योऽमोघश्च ॥ ३९ ॥**
**लभ्यतेऽपि तत्कृपयैव ॥ ४० ॥**

मोठ्यांची संगतिच मिळणें मुळीं कठिण, त्यांच्यापर्यंत लहानांनीं पोचण्याचीच भ्रांत. त्यांची सोबत लाभली तर मात्र वायां कधींच जात नाहीं. ती लाभली तर त्यांच्याच कृपेनें लाभायची.

जगीं थोर जे संग त्यांचा दुराप
लहाना न ये पोचण्या त्यासमीप
तिथें पोचला तो न जाईच वायां
कृपेनेंच त्यांच्या पदा ये शिवाया ! ॥ ३३ ॥

**तस्मिंस्तज्जने भेदाऽभावात् ॥ ४१ ॥**
**तदेव साध्यताम् तदेव साध्यताम् ॥ ४२ ॥**

गुणसंपन्नतेच्या दृष्टीनें विचार केला तर देवाच्या ठिकाणीं तेच गुण संतांच्या ठिकाणीं नांदतात. यामुळें देव आणि संत एकमेकासमान ठरतात. याचसाठीं साधकानें संतांची संगति अवश्यमेव करावीच करावी.

**प्रभूच्या ठिकाणीं गुणैश्वर्य नांदे
निकें तेंच संतांमधें हो अभेदें
करावाच सत्संग, सत्संगमार्गें
क्रमें भक्त हो देव देवानुरागें ! ॥ ३४ ॥**

७. प्रेमरूपा भक्तिमध्यें मुख्य विघ्न कुसंगति. सूत्रें ४३–४५ श्लो. ३५–३६

**दुःसंगः सर्वथैव त्याज्यः ॥ ४३ ॥**

**काम क्रोध मोह स्मृति भ्रंश बुद्धिनाश सर्वनाश कारणत्वात् ॥ ४४ ॥**

दुष्टांची संगति सर्वपरी टाकलीच पाहिजे. कारण दुःसंगतीमुळेंच काम, क्रोध, मोह इत्यादींना फावतें. आठवणी विसरतात. बुद्धि नाश पावते व त्यामुळेंच सर्वनाश ओढवतो.

त्यजावाचि दुःसंग निक्षूनि त्यानें
भलें कामकोपादिकां फावल्यानें
पडे मोह जीवा, स्मृतिभ्रंश होय
घडे बुद्धिनाशें निजस्वा अपाय ॥ ३५ ॥

तरंगायिता अपी ऽ मेसंगा त्समुद्रायंति ॥ ४५ ॥

या कामक्रोधादींचें पहिलें पहिलें स्वरूप अगदीं मंदमंद लाटाप्राय वाटतें. त्या यथाक्रम लहानाच्या मोठ्या होत जातात. होतां होतां त्यांचाच दुस्तर असा भरतीला पोचलेला महासागरच होऊन जातो.

भरारंभिच्या मंद वाटोत लाटा
क्रमें वाढती सिंधु पोचे दिगंता
तसे संधि साधूनि वाढूनि भारी
सहा शत्रु दुर्वार होती शरीरीं ! ॥ ३६ ॥

८. मायेपार कोण पोहोंचूं शकतो ? सूत्रें ४६-५० श्लोक ३७-४०

कस्तरति कस्तरति मायाम् ? यः संगांस्त्यजति.
यो महानुभावं सेवते निर्ममो भवति ॥ ४६ ॥

भगवंताची माया दुस्तर आहे हें भगवद्वाक्य प्रसिद्धच आहे. अशा दुस्तर मायेपार होणें, तिच्यांतून सहीसलामत तरून जाणें हा पुरुषार्थ कोणाला जिंकतां येतो ? कोणाला छातीठोकपणें करून दाखवितां येतो माहीत आहे ? तें समर्थपण एकट्या त्यालाच लाभूं शकतें व नांदवितां येतें कीं जो स्वकर्मफलासक्तीला टाकतो, जो साधुसंतांच्या भजनीं रमतो, त्यांचीच सेवा अहोरात्र करतो, जो ममत्वाकडे पाठ फिरवितो.

शके पोचण्या तोच मायेपल्याड
फलाची न ज्या कर्मठा कांहिं चाड
भजे साधुसंतासि जो जेविं देवा
कशाचा न ज्या लेश हव्यास ठावा ! ॥ ३७ ॥

यो विविक्तस्थानं सेवते, यो लोकबंधम् उन्मूलयति,
निस्त्रैगुण्यो भवति, योगक्षेमम् त्यजति ॥ ४७ ॥

जो दूर रानावनांत राहतो, जो समाजाचीं बंधनें समूळ उपटून मोकळा होतो, जो सत्व, रज, तम या त्रिगुणांना पिटाळून लावतो, जो धन मिळवण्याच्या वा मिळवलेल्या धनाच्या उठाठेवींत रहात नाहीं

वसे ओस रानांत तोडूनि आप्त-
स्वकीयादि पाशा, त्रिधाही गुणांत
न गुंतेचि जो ना धना जोडि, राखी
तरे दुस्तरा तोच मायाब्धिला कीं ! ॥ ३८ ॥

**यः कर्मफलम् त्यजति, कर्माणि संन्यस्यति, ततो निर्द्वंद्वो भवति ॥ ४८ ॥**

जो स्वकर्मांचें फल टाकतो, जो कर्मांचाही ठीकपणें त्याग करितो, जो लाभ-हानि, सुखदुःखें, इत्यादि ज्या द्वंद्वभावना आहेत त्यांनाही मानीत नाहीं तोच मायेच्या पार होतो.

स्वकर्मांसवें तत्फला टाकि कर्ता
घडे त्याहि जें कर्म तो दे अनंता
न त्या सौख्य वा दुःख ना लाभहानि
न तो हें पराचें स्वताचेंहि मानी ! ॥ ३९ ॥

**वेदानपि संन्यस्यति, केवलमविच्छिन्नानुरागम् लभते ॥ ४९ ॥**
**स तरति, स तरति लोकान्स्तारयति ॥ ५० ॥**

जो वेदाशास्त्रांनाही झुगारून बाजूला ठेवतो आणि अहोरात्र एकट्या भगवंताच्याच पावलांशीं आपलें मस्तक अखंड प्रेमवशपणें मिळवून देतो. भगवंतालाच आळवीत अखेर त्याच्या अनंतरूपांत स्वतः विरून जातो. तोच भगवंताच्या दुस्तर मायेंतून स्वतः तरून दुसऱ्यांनाही तारक हाता देऊं शकतो.

झुगारून वेदादिकां जो खुशाल
सदा विश्वनाथापदीं ठेवि भाल
रमे आळवी हो अनंतीं विलीन
तरे तो स्वता ने परा उद्धरून ॥ ४० ॥

९. प्रेमरूपा भक्ति व गौणी भक्ति सूत्रें ५१–५७ श्लोक ४१–४३

**अनिर्वचनीयम् प्रेमस्वरूपम् ॥ ५१ ॥**
**मूकाऽस्वादनवत् ॥ ५२ ॥**
**प्रकाशते क्वाऽपि पात्रे ॥ ५३ ॥**

प्रेमाचें स्वरूप शब्दानें वर्णून सांगतां येण्याजोगें नाहीं. मुक्या माणसानें

७४८००

कांहीं गोड वा कडू पदार्थ खाल्ला तर त्याच्याच्यानें त्या पदार्थाची गोडी अथवा कडवाई निवेदित होतच नाहीं. भवगत्प्रेम भक्ताच्या अनुभवाला त्याच्या भाग्यवशात् आलें कीं तें तिथल्या तिथें तत्काल व्यक्त होऊन जातें.

**शुचि प्रेम शब्दाश्रयें वर्णवे ना**
**गुळाचा कथो गोडवा केविं मोना ?**
**हृदीं प्रेम हो पुष्ट तों रोमपंक्ति**
**उभ्या भक्तदेहीं पटे ती प्रतीति ॥ ४१ ॥**

**गुणरहितम् कामनारहितम् प्रतिक्षणं वर्धमानम्**
**अविच्छिन्नम् सूक्ष्मतरम् अनुभवरूपम् ॥ ५४ ॥**

त्रिगुणांची ज्याला बाधा नाहीं, ज्याला कामनेचा विटाळ नाहीं, जें क्षणों क्षणीं वाढतच जातें, ज्यांत कधींच बिघाड होत नाहीं. जें सूक्ष्मांत सूक्ष्म आहे व जें अनुभवानेंच प्रत्यक्ष समजावें असेंच शुद्ध सात्विक प्रेम असतें.

**गुणी प्रेम नाहीं न कामी तसें तें**
**अहोरात्र वाढे नसे खंड ज्यांतें**
**अणूहून तद्रूप छोटे दिसाया**
**तरी तन्मया प्रेम ये ओळखाया ॥ ४२ ॥**

**तत् प्राप्य तदेवाव लोकयति, तदेव श्रुणोति, तदेव भाषयति तदेव चिन्तयति ॥ ५५ ॥**

भगवत्प्रेमाचा एकदां का लाभ झाला कीं जिथें तिथें तेंच दिसूं लागतें, तेंच ऐकूं येतें, तेंच बोलवूं लागतें आणि त्याचीच चिन्ता जडते.

**मिळे त्याक्षणाहूनि ज्या त्या ठिकाणीं**
**दिसे प्रेम बिंबे पडे तेंचि कानीं**
**वदूं तेंचि लावी मुखें वर्णनीय**
**मनें एकलें प्रेम हो चिन्तनीय ॥ ४३ ॥**

१०. गौणी भक्तीचे गुणभेदानुसार वा आर्तादि भक्तभेदानुसार तीन प्रकार. सूत्रें ५६–६७ श्लोक ४४–४८

**गौणी त्रिधा गुणभेदात् आर्तादिभेदात् वा ॥ ५६ ॥**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

इथवर जिची चर्चा झाली ती भगवद्भक्ति निष्काम, म्हणजेच उज्ज्वल अनन्य प्रकाराची होती. आतां जिची भाषा केली जाणार आहे ती त्रिगुणाश्रित भक्ति तशीच तीन प्रकारच्या आर्तादिक भक्तांच्या ठायींची म्हणून कांहीं अंशीं उण्या कसाची भक्ति म्हटली आहे.

गुणांनीं त्रिधा बद्ध ती भक्ति गौण
असे लेखिती संत भक्तिप्रवीण
त्रिधा भक्त जे आर्त, जिज्ञासु, अर्थी
प्रभूच्या पदीं साधण्या मोक्ष येती ॥ ४४ ॥

म्हणूं तीच ये भक्ति सत्वप्रधान
जिनें द्वैत बुद्धया उपास्या भजून
निजस्वा प्रभूच्या पदीं अर्पि भक्त
फिटे पाप हो तो भवांतूनि मुक्त ! ॥ ४५ ॥

सुखें इंद्रियांचीं तशी वैभवादि
यशें ऐहिकें प्राप्त ज्यांच्या प्रसादीं
अशा देवतामूर्ति कल्पूनि हो ती
म्हणा राजसी भक्तिची ख्यात रीति ॥ ४६ ॥

तिजी तामसी भक्ति ती लेखि देव
दयाशील ना होय उग्र स्वभाव
करूं तुष्ट त्या चिंति उग्रा उपाया
हटानें नको तें करी कष्ट वायां ॥ ४७ ॥

## उत्तरस्मादुत्तरस्मात् पूर्वपूर्वा श्रेयाय भवति ॥ ५७ ॥

पुढें पुढें या त्रिविधा भक्ति आणि हे त्रिविध भक्त आपापल्या भक्तीप्रमाणें आणि आपापल्या वर्गाप्रमाणें श्रेयाची प्राप्ति करून घेतात. आर्तभक्ताला त्याची सात्विकी भक्ति सुफलप्रद होते. जिज्ञासु व अर्थार्थी भक्तांना त्यांच्या भक्तिप्रकारांना साजेसें श्रेय येतें.

कडू, कांहिंशीं गोड, अत्यंत गोड
क्रमें दे फळांची त्रिधा भक्ति जोड
त्रिधा भक्त अर्थार्थि जिज्ञासु, आर्त
पदा पोचती पात्रता जेवि त्यांत ॥ ४८ ॥

११. भक्तीची सुलभता आणि महत्ता सूत्रे ५८-६० श्लोक ४९-५०

**अन्यस्मा त्सौलभ्यम् भक्तौ ॥ ५८ ॥**

परमेश्वरप्राप्तीचीं जपतपादि कठिण साधनें आहेत त्या मानानें भक्ति हेंच सर्वांत सोप्यांत सोपें साधन आहे.

**विनायास संपादितां ये कुणाही**
**जगीं एकली भक्ति ना अन्य कांहीं**
**हवा ईश्वरीं मात्र विश्वास गाढ**
**गुणांची धनाची कुलाची न चाड ॥ ४९ ॥**

**प्रमाणान्तरस्यानपेक्षत्वात् स्वयं प्रमाणत्वात् ॥ ५९ ॥**

भक्तिमार्ग कसा सोप्यांत सोपा आहे हें ठरविण्याला अन्य कोणत्याही प्रमाणाची गरजच नाहीं. त्या मार्गाचें सोपेंपण ती साक्ष आपणच देतें.

**शान्तिरूपात् परमानंदरूपाच्च ॥ ६० ॥**

भक्तीचें स्वरूप शान्तिमय आहे. परमानंदपूर्ण आहे.

**कळे भक्ति त्या जो निघे भक्तिपंथें**
**सुखें भक्तिचीं सेव्य भक्तेंचि चित्तें**
**न भंगे गमे शान्ति भेटेचि गाढ**
**धरी सिन्धुसा सच्चिदानंद वाढ ॥ ५० ॥**

१२. भक्तीचीं साधनें व विघ्नें. सूत्रें ६१-६५ श्लोक ५१-५८

**लोकहानौ चिन्ता न कार्या निवेदितात्मलोकवेदत्वात् ॥ ६१ ॥**

भक्तानें आपल्या होणाऱ्या लौकिकाची हानि पाहूं नये. कारण त्यानें आपल्या लौकिकाला त्याचप्रमाणें वैदिक कर्माला परमेश्वरचरणीं आधींच वाहिलेलें असतें.

**भलें वा बुरें आपलें नांव कांहीं**
**असो तें निजस्वासवें भक्त वाही**
**प्रभूला; तिये तें बुडो वा तरोही**
**न चिन्तांश कर्तव्य भक्तासि राही ॥ ५१ ॥**

**न तदसिद्धौ लोक व्यवहारो हेयः किन्तु फलत्यागः तत्साधनंच कार्यमेव ॥ ६२ ॥**

भक्तिपंथांत असतांना आपल्याला यावें तें यश आलें नाहीं तरी चालू लोकव्यवहार टाकूं नयेत. तथापि लोकव्यवहार हेंच तदर्थ साधन म्हणून वापरावेत व त्यांत प्राप्त होणारें फल मात्र टाकावें.

न जों भक्तिपंथीं करप्राप्त सिद्धि
न ये टाकतां साधका रीतिरूढि
अनन्यें मनानें करावीच भक्ति
न व्हावा फलप्राप्तिचा हेतु पोटीं ॥ ५२ ॥

**स्त्री, धन, नास्तिक वैरि चरित्रम् न श्रवणीयम् ॥ ६३ ॥**

भक्तिमार्गाचा अभ्यास करणाऱ्याने स्त्रीच्या, धनाच्या त्याचप्रमाणें नास्तिक प्रवृत्तीच्या व भगवंताशीं वैरभाव धारण करणाऱ्यांच्या गोष्टी ऐकूं नयेत. तीं विघ्नें समजून त्यांपासून दूर रहावें.

उभीं भक्तिमार्गांत विघ्नें न थोडीं
धन, स्त्री, तसे शत्रु पाखंडवादी
अशांचा धरावा न लोभांश पोटीं
न त्या आयकाव्या कथाव्याहि गोष्टी ॥ ५३ ॥

**अभिमानदंभादिकम् त्याज्यम् ॥ ६४ ॥**

भक्तिमार्गीयानें वृथाभिमानाला त्याचप्रमाणें ढोंगा-सोंगांना सवड देऊं घेऊं नये.

खरा मीच धर्मी जगीं मीच त्यागी
उगा गर्व वाहील हा तो अभागी
गुणांशाविणेंही गुणाढ्यत्व सांगे
मुळीं त्याज्य तो गर्व तीं ढोंगसोंगें ॥ ५४ ॥

**तदर्पिताऽखिलाऽचारः सन् कामक्रोधाऽभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम् ॥ ६५ ॥**

भक्तानें आपल्या हातीं होणाऱ्या सर्वच्या सर्व कर्मांना, देवार्पणबुद्धीनेंच

तीं करण्याचें ठरविल्यामुळें तो कामक्रोधाऽभिमानादिकांना वश होऊन जें वर्तन करील तेंहि देवालाच समर्पण करावें.

घडे कर्म तें तें दिलें देवराया
अशा एकनिष्ठाहि भक्ता छळाया
क्वचित्कामकोपादि होतां प्रवृत्त
प्रभूलाचि भक्तें वहावे कुवृत्त! ॥ ५५ ॥

बळावे क्वचित् तोहि सावेश काम
नियोजूनि भक्तें भजावाच राम
दुजा रामसा कोण सौंदर्यशाली
पहातांच ज्या मुग्ध ना भक्ति झाली! ॥ ५६ ॥

कधीं क्रोध सीमेसि सांडू धजावे
नृसिंहावताराचि त्या भेटवावें
भयोत्कृष्ट तें ध्यान दैत्याहि मोडी
तिथें कायशी मर्त्य मांडो धडाडी? ॥ ५७ ॥

कधीं गर्व पोचूं शिगेला निघाला
कथा रावणी त्या कथा धांक घाला
कुठें सार्वभौमत्व ते शक्तिशाली
कुठें बापुडीं वानरें धन्य झालीं! ॥ ५८ ॥

२३. प्रेमी भक्तांचा महिमा. सूत्रें ६६–७२ श्लोक ५९–७१

**त्रिरूप-भंगपूर्वकम् नित्यदास नित्यकांता भजनाऽत्मकम् वा प्रेमैव कार्यम् प्रेमैव कार्यम् ॥ ६६ ॥**

आपण भक्त आहों, भगवान् आपलें आराध्यदैवत आहे. त्याची पूजा करणें हेंच आपलें कर्तव्य आहे अशी भेदभावाची जाणीव टाकून भगवंताची सेवा, दासानें आपल्या स्वामीची वा कान्तेनें आपल्या भ्रताराची निष्ठावंतपणें करावी, तशीच आपण करावी. भगवंतावर एकच एक प्रेम निष्काम प्रेम करावें.

फुलें, देवता, पूजिता हीं निराळीं
त्रिधा पाहतां पूजनारंभ–काळीं

तरी पूजनान्तीं विरे भेदभाव
स्फुरे ऐक्य हा श्लाघ्य भक्तिप्रभाव ॥ ५९ ॥
मुहूर्तीं वधूचा धरी हात भर्ता
न तों ऐक्य बाणेचि दोघांहि चित्तां
वधू वाहिली हो वरा सर्वभावें
तसें दैवतीं पूर्ण भक्तें विरावें ! ॥ ६० ॥
स्वराष्ट्रार्थ हर्षें रणीं राष्ट्रभक्त
उडी घे निजस्वा समर्पी विरक्त
गणो विस्मरो राष्ट्र त्या क्षुद्र रेणू
विरो दैवतीं भक्त ये धन्य मानूं ! ॥ ६१ ॥
भजो भक्त देवासि कान्ता स्वकान्ता
जशी सेवक स्वामिच्या राखि चित्ता
समर्पूनि सर्वस्व ऐक्यासि पोसूं
शुचि प्रेमरूपा प्रभूला उपासूं

**भक्ता एकान्तिनो मुख्याः ॥ ६७ ॥**
**कंठावरोधरोमांचाऽश्रुभिः परस्परंलपमाना पावयन्ति कुलानि पृथिवीम् च ॥ ६८ ॥**

अनन्य भक्ति श्रीमंत असतात त्यांची—त्या भक्तांची महती काय सांगावी ! एकमेकांच्या गळां पडून, अंगावर सात्विक रोमावलि उभी असतांना, डोळ्यांवाटें प्रेमाश्रूंची वृष्टि होत होत भक्तमंडळीं जेव्हां भक्तीची चर्चा करितात तेव्हां तद्द्वारा कुळांचीच काय उभ्या पृथिवीचीदेखील उन्नति होतेच.

महाभाग ते भक्त ज्यांची कुठेंही
रिघो दृष्टि तेथें प्रभूलाचि पाही
अनन्यत्व तद्भक्तिचा हो विशेष
प्रभुव्याप्त हें विश्व नांदे अशेष ॥ ६३ ॥
गळे दाटती, लोटती अश्रु, देहीं
उठे रोम, संवादती जैं विदेही
कुळांचा नव्हे सर्वही भूतळाचा
समुद्धार साधूं क्षमा साधुवाचा ! ॥ ६४ ॥

**तीर्थीकुर्वन्ति तीर्थानि सुकर्मी कुर्वन्ति कर्माणि सत्शास्त्रीकुर्वन्ति शास्त्राणि ॥ ६६ ॥**
**तन्मयाः ॥ ६७ ॥**

संत सज्जन हे देवाशीं इतके तन्मय झालेले असतात कीं त्यांच्या संगतीचा लाभ होतांच तीर्थाक्षेत्रांना ठीक पवित्रता बाणते. सत्संगतीनें जें कांहीं कर्म घडेल त्याला सत्कर्माची पदवी येते, सज्जनांशीं केलेल्या गप्पागोष्टींनाही सुभाषिताची सर येते.

> भरे तीर्थता साधुसंगेचि तीर्थीं
> सुकर्मत्व कर्मांसि ये साधुहातीं
> दिली शास्त्रता साधुवाक्येंचि शास्त्रा
> सदा रामनामेंचि त्या येति वक्त्रा ॥ ६५ ॥
>
> मिळाली नदी सागरा होय खारी
> मुको गोडिला तोय ती ना विचारी
> घनश्यामला तन्मया हो वहाती
> अनन्या तशी ध्येयरूपाचि भक्ति ॥ ६६ ॥

**मोदन्ते पितरो नृत्यन्ति देवताः सनाथाचेयम् भूर्भवति ॥ ७१ ॥**

ज्या कोणाच्या वंशांत संतसज्जनांचे जन्म होतात त्यांना व त्यांच्या पूर्वजांनाही अत्यानंद होतो. जे जिवंत असतील त्यांना आपलें कुल सामाजिकदृष्ट्या उंचावल्याचा आनंद होतो तर मृत पितरांना पिंड आणि पाणी यांची प्राप्ति सुख देते. देवतांना आपल्या भक्तांचा उत्कर्ष झाल्यानें नाच करण्याची इच्छा होते. धरणीमातेला आपण सनाथ झाल्याचें सुख लाभतें.

> महात्माऽवतार स्ववंशांत झाला
> असें आढळे ज्या मृता पूर्वजाला
> तदानंद पोटीं न मावेचि कीं त्या
> भुकेल्या नुरे तोयपिंडादि चिन्ता ! ॥ ६७ ॥
>
> महात्मा ऽ वतारें न तो वंश मात्र
> उभें भूतल क्षेत्रसें हो पवित्र

पुनर्जीवना घे जनीं लुप्त तें तें
स्वकर्म स्वधर्मोदया इष्ट होतें ॥ ६८ ॥

पुनः लुप्तधर्मोदया पाहतांच
मुदें मांडिती देवता कां न नाच ?
भुकेल्याच त्या कीं दिसो देवराय
स्वभक्ता जपाया घरे प्राप्त होय ॥ ६९ ॥

**नास्ति तेषु जातिविद्यारूपकुलधनक्रियादि भेदः ॥ ७२ ॥**

साधुपुरुषांच्या ठिकाणीं स्वजाति, विद्या, सौंदर्य, कुल, श्रीमंती, कर्तबगारी इत्यादि भेदभावाची जाणीव जागत नाहीं. त्यांना सर्वत्र समानता पटते.

कुळें उच्च वा नीच हो भक्त लोकीं
न हो भक्तिमार्गी उणें वाढ तें कीं
प्रभूच्या कृपें पात्र भक्त्या अनन्य
भजे धन्य हो तो दिसो मूर्त दैन्य ॥ ७० ॥

अविद्या सुविद्या कुरूपा सुरूपा
प्रभुप्राप्ति हो आत्मभावानुरूपा
नसो ज्ञान कर्मादि भक्तासि पाठ
अनन्या हवी भक्तिशीं मात्र गांठ ॥ ७१ ॥

१४. वादविवादरूपी विघ्नें. सूत्रें ७३–७५ श्लोक ७२–७४

**यतस्तदीयाः ॥ ७३ ॥**
**वादोनावलंब्यः ॥ ७४ ॥**
**बाहुल्यावकाशादनियतत्वाच्च ॥ ७५ ॥**

ज्या ज्या कोणी देवाशीं अनन्य भक्तीचें नातें जोडलें त्यांनीं परस्परांत वादविवादांचा आश्रय करूं नये. वादविवादाला दोन्हीकडे सवड इतकी असते कीं त्याला आळा घालतां येत नाहीं.

प्रभूशीं स्वभक्त्या मनें भक्त बद्ध
न घालोत वादीं विवादीं पलाधं

क्षणीं कांहिंच्या कांहिं हो आगळीक
अमर्याद तर्का तिथें मोकळीक ॥ ७२ ॥

सुटावींत ईशप्रसादेंचि कोडीं
थके तर्क जेथें करो कैक दौडी
असे प्रश्न निर्मूनि घालूनि वाद
कधीं भक्तिमार्गी न व्हावेचि भेद ॥ ७३ ॥

मता आग्रहें आपल्या दामटावें
न अन्या कुणाही सुजाणा पुसावें
असें द्वंद्व जो पोषि त्याला अनंतीं
कसें ये विरूं ध्येय जें भक्तिपंथीं ॥ ७४ ॥

१५. भक्तीचे प्रमुख पुरस्कर्ते. सूत्रे ७६–७९ श्लोक ७५–९०

**भक्तिशास्त्राणि मननीयानि तदुद्बोधक कर्माणि करणीयानी ॥ ७६ ॥**

भक्तिशास्त्राचें मनन केलें पाहिजे. भक्तीला जागृति ज्या ज्या सत्कर्मांनीं प्राप्त होईल तीं तीं करावींत.

हवी साधका ज्या करूं प्रेमभक्ति
शिको शास्त्र तें तो मतें बाणवो तीं
करो श्रद्धया तींच कर्तव्यकर्में
वरो श्रेय चालूनि उक्त स्वधर्में ॥ ७५ ॥

न तर्का वितर्का मुळीं ठाव द्यावा
मनें निर्मलें ग्रंथ तो अभ्यसावा
प्रभूच्या यशोगायना वाहिलेला
रुजो भक्तिवल्ली धरो पालवीला ॥ ७६ ॥

मुदें निंदितें जें जगन्नायकाला
शिवावेंहि ना त्या करें पुस्तकाला
बळें भक्तिमूलींच जे घालि घांव
लिहो त्या विधाताहि तें त्याज्य नांव ! ॥ ७७ ॥

मुलें माणसें जीं घरीं तेवीं दारीं
जशीं देवरूपेंचि हो सेव्य सारीं
समस्ताहि लावूनि गोडी म्हणावें
रमा भक्तिमार्गीं स्वतांही रमावें ॥ ७८ ॥

स्वकल्याण मोठ्यांत मोठें कराया
धरावें नतें सद्गुरूच्याच पायां
तदुक्तें हटे सर्व शंकासमूह
हृदीं आढळे थाटलें ब्रह्मगेह ! ॥ ७९ ॥

प्रभूला रुचे तोच भक्तांत भक्त
न जो हृष्ट सौख्यें न दुःखेंहि तप्त
न निंदेसि भी जो न भाळे स्तुतीला
फिटे द्वंद्व यद्बुद्धि घे निश्चयाला ॥ ८० ॥

**सुखदुःखेच्छा लाभादि त्यक्ते काले प्रतीक्ष्यमाणे क्षणार्धम् अपि व्यर्थं न नेयम् ॥ ७७ ॥**

सुखदुःखाकडे लक्ष ठेवून, लाभहानि संभाळून बनेल तेव्हां सवडीप्रमाणें देवदेव करूं असें साधकानें म्हणूं नये. इतकेंच काय, लाभेल तो क्षण नव्हे क्षणार्धही देवाच्या भजनीं साधकानें तत्परतेनें लावावा.

सुखें ऐहिकें घेत दुःखें हरावीं
पुरीं इष्ट वेळींच कार्यें करावीं
अशांतूनि फांवे तदा "देवदेव"
करावा म्हणे तो फसे तावदेव ! ॥ ८१ ॥

कधीं दुःख संपे कधीं सौख्य वाढे ?
सुजाणाहि कोणा न होती निवाडे,
रहाटे दशाचक्र नेणे विराम
फसे त्याच फेर्‍यांत वा होय काम ॥ ८२ ॥

बरा याचसाठीं मिळाला निमेष
निमेषार्धही दक्षतेनें हमेश
सरो सच्चिदानंदपादीं जडून
मना साधकाच्या दुजा छंद हो न ॥ ८३ ॥

**अहिंसा सत्य शौच दयाऽस्तिक्यादि चारित्र्याणि परिपालनीयानि ॥ ७८ ॥**

साधकानें आपल्या चारित्र्याला संभाळून चालतांना अहिंसा, सत्य, शुद्धता, दयाशीलता, परमेश्वराच्या आस्तिक्यावर अचल श्रद्धा अवश्य पोसावी.

स्वयें देव व्हावेंचि जो वांच्छि त्यानें
निजांगीं तशा लक्षणांना प्रयत्नें
पुरें बाणवावें; कसा मेघ तोया—
विणें चातका सिध्द हो बिंदु द्याया? ॥ ८४ ॥
न शब्दें कुणाचें पिचो अंतरंग
न भंगोचि बाणार्पणें तेवि अंग
अहिंसा अशी पाहिजे आचराया
जगावें स्वतां देत लोका जगाया ॥ ८५ ॥
वदावें खरें ठाउकें तेवढेंच
मनीं देहिं गेहीं न भंगोचि शौच
दया भूतमात्रीं कराया समान
स्वकीयासि द्यावा परा तेविं मान ॥ ८६ ॥
असो काष्ठ पाषाण वा मृत्तिकाही
प्रभू वस्तुवस्तूंत अव्यक्त राही
तरी खास पोचेचि त्या हांक देतां
क्षणीं धांव घे सोडवी आर्त भक्ता ॥ ८७ ॥
न भ्यावेंचि कोणा सदा शुद्धचित्तीं
हवा नांदता देव; हो दान हातीं
निजाधीन ही इंद्रियें शत्रु सा-ही
हवें निग्रहीं ठेविले साधकांहीं ॥ ८८ ॥
भरे एक आत्माचि आत्मा जगांत
शके भक्ति दृष्टया बघूं त्यासि भक्त
क्रमें द्वैत लोपे परात्म्यांत लीन
भिडे जेथला तेथ देही फिरून ॥ ८९ ॥

**सर्वदा सर्वभावेन निश्चिंतितैर्भगवानेव भजनीयः ॥ ७९ ॥**

सर्वदा सर्वपरींनीं साधकांनीं चिंतांना हटवून एकस्या भगवंताचेंच भजन मनोभावें करावें.

"स्वयं ब्रह्म" ही जाण होतांच भक्ता
हटे सारली सर्वथा दूर चिन्ता
जगन्नाथपादारविंदीं मिलिंद
लुटे अद्वयानंद नोहे मरंद ॥ ९० ॥

१६. प्रेमाभक्तीचें फल आणि तिची सर्वश्रेष्ठता. सूत्रें ८०–८४ श्लोक ९०–१०२

**स कीर्त्यमानः शीघ्रमेवाऽविर्भवति, अनुभावयतिच भक्तान् ॥ ८० ॥**

भगवंताचें गुणसंकीर्तन केलें असतांना तो मुळींच विलंब न लावतां प्रकट होतो व भक्तांना आपलें दर्शनही देतो.

प्रभूच्या यशा भक्त गाईल तों तों
उभा शीघ्र धांवूनि हो त्यापुढें तो
जिचा ध्यास भक्तांतरीं सारखा ती
धरी मूर्ति सौंदर्य सर्वस्व होती ॥ ९१ ॥

**त्रिसत्यस्य भक्तिरेव गरीयसी भक्तिरेव गरीयसी ॥ ८१ ॥**

ज्याचा उच्चार मोठ्यांत मोठ्या आवाजानें कायावाचामनःपूर्वक, वर्तमान भूतभविष्य या त्रिकाळीं गर्जून करावा असें भगवद्भक्ति हेंच मोठ्यांत मोठें तत्त्व आहे.

स्वदेहें स्ववाचें स्वचित्तें तसेंच
पटे जें त्रिकाळींहि विश्वांत साच
असें भक्ति हें सत्य सत्यांत मोठें
दिगंती भिडूं द्याच या घोषणेतें ॥ ९२ ॥

**गुणमाहात्म्यासक्ति, रूपासक्ति, पूजासक्ति, स्मरणासक्ति दास्यासक्ति, सख्यासक्ति, कान्तासक्ति, वात्सल्यासक्ति आत्मनिवेदनासक्ति तन्मयतासक्ति, परमविरहासक्ति एकधाऽप्येकादशधा भवति ॥ ८२ ॥**

भक्तानें भगवंताविषयीं आपल्या मनांत अहोरात्र पोसावी नांदवावी ती आसक्तीची भावना—ती उत्कट अनन्यभक्ति—वस्तुतः पहावी तों एकच एक आहे पण तिच्या तऱ्हा दिसून येतात अकरा! भगवंताच्या गुणांच्या मोठेपणाला वाहिलेली एक तर त्याच्या रूपसौंदर्याला भाळलेली, दुसरी–तिसरीला त्याच्या पूजेअर्चेचेंच वेड, तर चौथी अहोरात्र त्याच्या स्मरणांतच रंगलेली. पांचवीला त्याचें परोपरीनें दास्यच आवडतें, तर सहावीला त्याच्या सख्याचीच हांव. सातवीला त्याची आपण जशी कान्ता होण्याचाच छंद, तर आठवीला देवकीच्या उदरीं आलेल्या तिच्या आठव्या अपत्त्यासारखेंच देवानें आपल्याही पोटीं अवतरावेंच हेंच वेड! नववीला वाटतें कीं देवानें अहोरात्र कान देऊन आपल्या गुजगोष्टीच ऐकत बसावें, तर दहावीला कधीं एकदां आत्मार्पण करून भगवंताशीं आपण कायमचेंच मिळून जाऊं हीच उताविळी झालेली. अकरावीला भगवंताच्या अहोरात्र विरहांत राहून त्याच्या कानीं आपल्या "विराण्या" घालीत राहण्यांतच धन्यता वाटते!

> **प्रभो, त्वद्गुणांचीच थोरीव मोही**
> **कुणा रूपसंपत्तिचें वेड राही**
> **जडे च्छंद पूजाविधीचाच कोणा**
> **स्मरावा स्मरावा गमे देवराणा ॥ ९३ ॥**
>
> **प्रभो, दास्य कोणा तुझें नित्य व्हावें**
> **कुणा सख्य संपादणें मात्र ठावें**
> **कुणा कान्त एकान्त मांडूं हवास**
> **कुणी आळवी "बाळ हो, ये कुशीस"! ॥ ९४ ॥**
>
> **रहस्यें स्वताचीं स्वतां सांगतात**
> **कुणी त्वन्मयत्वासि पोचूं पहात**
> **कुणा त्वद्वियोगेंचि हो भक्तिवृध्दि**
> **तुझी एकधा नैकधा होय भक्ति!" ॥ ९५ ॥**

**इत्येवम् वदन्ति जनजल्प निर्भया एकमताः कुमार व्यास शुक शांडिल्य गर्ग विष्णु कौंडिण्य शेषोद्धवारुणि बलि हनुमद् बिभीषणाद्यो भक्त्याचार्याः ॥ ८३ ॥**

भगवान् सनत्कुमार वेदव्यास, शुकाचार्य, शांडिल्य, गर्गमहामुनि, विष्णु

कौंडिण्य, शेष, उद्धव, अरुणि, बलि, हनुमान्, बिभीषण इत्यादि जे जे भक्तिशास्त्रामध्यें प्रवीण आचार्य पदवीला पोचले त्यांनीं इतरेजन कांहींही म्हणोत तें म्हणणें निर्भयपणें बाजूला एकमतानें सारून स्वच्छ दिला तो निवाडा हाच कीं भगवंताची भक्ति किती परोपरींनीं केली तरी ती एकच एक भक्ति होय हेंच तत्त्व या नारदीय सूत्रांत आहे.

अशीं नारदें भक्तिसूत्रें रचून
दिलीं ज्यांकडे "पारखा जी" म्हणून
अशा पंडितीं भक्तिशास्त्र प्रवीण
पहा सिद्ध योगी तपी कोणकोण ! ॥ ९६ ॥
कुमारें सनत्पूर्वकें "देव व्हावें"
अशा हेतुनें श्रीहरीचींच नांवें
अहोरात्र घेऊन हा भक्तिपंथ
पुढें आणिला अग्रणी होत सार्थ ॥ ९७ ॥
उदंडें पुराणें रची व्यास गात
हरीच्या कथा भक्तिचें मूळ ज्यांत
शुकाच्या मुखें पोचलें ऐकल्याला
पिसें भक्तिचें लाविती कृष्णलीला ॥ ९८ ॥
रची भक्तिसूत्रासि शांडिल्य तेवीं
निजाचार आचार्यसा नित्य ठेवी
जनीं 'संहिता' ख्यात गर्गे प्रणीता
गमे भक्तिगंगाच न्हात्या मलार्ता ॥ ९९ ॥
पुरा जीवनग्रंथ भक्तिप्रधान
करूं ज्यासि ये तो लिहो शब्दही न
तरी गर्गशांडिल्यसा भक्तिपंथीं
ठरे वंद्य आचार्य चारीं दिगंतीं ॥ १०० ॥
जगद्वंद्य भक्त्या चिरंजीव कीर्त्या
अशांनीं मतैक्यें प्रशंसूनि धृत्या
विरोधा निवारूनि हीं नारदोक्तें
दिलीं भक्तिसूत्रें जगाच्या हितार्थें ॥ १०१ ॥

य इदम् नारदोक्तं शिवानुशासनं विश्वसति श्रद्धत्त
स प्रेष्ठम् लभते स प्रेष्ठम् लभते इति ॥ ८४ ॥

हें नारदानें सांगितलेलें कल्याणमय सूत्र जो कोणी श्रद्धेनें विश्वासपूर्वक ग्रहण करील त्याच्यावर कल्याणमूर्ति शिवाची कृपा होईल व त्याला अत्यंत प्रिय असलेलें भगवत्पद प्राप्त होईलच !

वृत्तः—वसंततिलका.

श्रीनारदें विवरिलीं मधु भक्तिसूत्रें
सूत्राश्रिता शिव बघे स्वकृपाळु नेत्रें
विश्वास दास दृढ हा स्वहृदीं धरील
त्या विश्वनाथ न चुके द्रुत उद्धरील ॥ १०२ ॥

## उपसंहार

वृत्तः—मंदाक्रान्ता.

देवर्षींची रूचिर बहरे भक्तिची कल्पवल्ली
सूत्रें पुष्पें प्रभुवरपदीं वाहिली देव-बोलीं
तीं चौऱ्यांशी सुलभ जनते प्राकृतीं सिद्ध केलीं
चौऱ्यांशीला चुकवितिल ते गंध जे घेति कालीं ॥ १०३ ॥

क्र. 78600
REFBK-0014800
REFBK-0014800

अनुक्रम


# सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लि.

मुख्य कचेरी : **मेहता इस्टेट, रानडे रोड, दादर, मुंबई**

शाखा : **गिरगांव, माटुंगा, फोर्ट**

याशिवाय मुंबईत कॉंग्रेस हाऊसजवळ शाखा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट

**सर्व प्रमुख व्यापारी शहरावर डिमांड ड्राफ्ट देणेची व्यवस्था**

या सतत प्रगतीपथावर असलेल्या बँकेमार्फत
आपले बँकिंगचे व्यवहार करा.



# सरदारगृह

**मुंबईत राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय**
**मंगलकार्ये व मेजवान्या यासाठीं सोईस्कर ठिकाण**

आमचीं वैशिष्ट्यें

- हीरकमहोत्सवानिमित्त अद्यावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
- टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. : ३८३३७ **सरदारगृह प्रा. लि.** तार : सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई २

डिंक लाडू ❀ आळीव लाडू
मेथी लाडू ❀ अनारसे

व इतर उपहाराचे पदार्थ

★

न्यू आदर्श दुग्ध मंदिर

रानडे रोड, दादर, (वे. रे.) मुंबई-२८

निखिल भारतीयांचें अखंड स्वागत

KULKARNI BROS.

SCIENTIFIC OPTICIANS,

217, Crown Building, Girgaon Road,
Opp. Kele Wadi,
BOMBAY 4.

*Prop.* : **D. G. Kulkarni**





*Extra Ordinary Attractive Site*
*Sorrounded By National Scenes and with a*
*Lake-view*

# POWAI

**Have your own plot, bunglow, cottage or flat**

*CONTACT*

**Shri Gopal Housing & Plantation Society**

POWAI, BOMBAY-76
**Tel. 581235/582037**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक .................... नोंद दि: ....................

Phone: 42484 Grams: "Madhavashram"
Bombay

# MADHAVASHRAM
## PVT. LTD.

### LODGING & BOARDING

Girgaon – Bombay 4.

